॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
परिस्थितिला शरण न जाता
परिस्थितीवर मात करा.

आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.
आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप
आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi

■ अहमदनगर ■ रविवार, दि. १९ मे २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक ७४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

'नागवडे'कडून प्रति टन २७०० रुपये प्रमाणे ऊस पेमेंट वर्ग

पान क्र. २ वर

दारुबंदी असलेल्या राजूरमध्ये पकडली अवैध दारु

पान क्र. ३ वर

शहीद जवान ज्ञानेश्वर सानप अनंतात विलिन

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### येत्या ४८ तासांत मान्सून अंदमानात दाखल होणार

● **पुणे ।** अनुकूल स्थितीमुळे मान्सून येत्या ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्रासह निकोबार बेटे तसेच बंगालच्या उपसागरातील वायव्य बेटांवर दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, वायव्य बंगालच्या उपसागरात २२ मे रोजी कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे, तर २४ मे रोजी बंगालच्या उपसागरातील याच कमी दाबाचे रूपांतर तीव्र कमी दाबाच्या पट्टयात होणार आहे. ते मध्य पूर्व बंगालच्या उपसागरापर्यंत असणार आहे. या दोन्ही स्थिती मान्सून दाखल होण्यास अनुकूल आहेत. या स्थितीची तीव्रता कायम राहिल्यास केरळमध्ये वेळेपूर्वीच मान्सून दाखल होईल, असाही अंदाज वर्तविला आहे.

### देवेंद्र गांधीसह पत्नीचा अटकपूर्व जामीन नामंजूर

● **नगर ।** नगर अर्बन बँकेतील कर्ज फसवणूक व कर्ज घोटाळा प्रकरणात अटकपूर्व जामीनासाठी देवेंद्र दिलीप गांधी आणि त्यांच्या पत्नी प्रगती देवेंद्र गांधी यांनी न्यायालयात अर्ज दाखल केले होते. त्यांचे जामीन अर्ज जिल्हा न्यायाधीश पी. आर. सित्रे यांनी नामंजूर केला आहे. दरम्यान अटकेत असलेल्या संगमनेर येथील उद्योजक अमित वल्लभराय पंडित याचा जामीन अर्ज देखील न्यायाधीश सित्रे यांनी नामंजूर केला आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडून अर्बन बँक घोटाळ्याचा तपास सुरू आहे. अटकेत असलेल्या कर्जदार व बँकेच्या अधिकार्यांनी जामीनासाठी न्यायालयात अर्ज सादर केले आहेत. तसेच, या व्यतिरिक्त काही जणांनी अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केले आहेत. फॉरेन्सिक ऑडिटमध्ये ठपका असलेल्या १०५ जणांची यादी लिक झाल्यानंतर अनेक संशयित पसार झाले आहेत. त्यातील काहींसह ज्यांची या यादीत नावे नाहीत अशांनीही अटकपूर्व जामीन अर्जासाठी न्यायालयात धाव घेतली आहे.

# महाराष्ट्रातील लोकसभेचा प्रचार संपला

## पाचव्या टप्प्यासाठी उद्या मतदान । महायुती आणि महाविकास आघाडीची प्रतिष्ठा पणाला

● **मुंबई । वीरभूमी –**
लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील पाचव्या आणि अंतिम टप्प्यातील प्रचाराला शनिवारी पूर्णविराम मिळाला. मुंबईतील सहा जागांसह ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या १३ लोकसभा मतदारसंघांत सोमवार, दि. २० मे रोजी मतदान होणार आहे. पाचव्या टप्प्यातील प्रचारासाठी महायुती आणि महाविकास आघाडीने आपली प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

प्रचाराच्या शेवटच्या दिवशीसुद्धा दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जोरदार टीकास्त्र सोडल्याने राजकीय तापमानसुद्धा वाढल्याचे चित्र आहे. प्रत्यक्ष प्रचाराचा कालावधी संपला असला, तरी आता पुढील दोन दिवस छुप्या प्रचाराला गती येणार आहे. त्यामुळे निवडणूक आयोगासह संपूर्ण निवडणूक यंत्रणा सतर्क झाली आहे.

'मविआ'कडून भाजपवर हल्लाबोल शनिवारी प्रचाराच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडीने संयुक्त पत्रकार परिषद घेत महायुतीवर विशेषतः भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी पवार गटाच्या शरद पवारांसह महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेतून पंतप्रधान

नरेंद्र मोदी आणि भाजपचा समाचार घेतला. त्यानंतर, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांच्या मतदारसंघात रोड शो केला. मुंबईत रोड शो तसेच ठाकरे गटाच्या उमेदवारांसाठी दक्षिण मध्य आणि दक्षिण मुंबईत सभा घेतल्या. या सभांच्या माध्यमातून त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकेची झोड उठवली. या प्रचाराची सांगता उद्धव ठाकरे यांनी मुंबादेवी मंदिरात दर्शनाने केली.

दुसरीकडे, महायुतीनेही अखेरच्या दिवशी मुंबई महानगरात प्रचाराचा धुराळा उडवून दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुक्रवारच्या जाहीर सभेनंतर शनिवारी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मुंबईत प्रचार सभा घेतली. तसेच, रॅलीच्या माध्यमातून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला.

भाजपने महाराष्ट्रातील अंतिम टप्प्यातील प्रचारासाठी संपूर्ण यंत्रणा कामाला लावली आहे. देशभरातील पाच मुख्यमंत्री, केंद्रीय अर्थमंत्री, विदेशमंत्र्यांसह अर्धा डझन केंद्रीय मंत्र्यांनी आतापर्यंत प्रचारात सहभाग घेतला. याशिवाय, तामिळनाडू भाजपचे प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई, हैदराबादेत ओवैसींविरोधात निवडणूक लढविणाऱ्या माधवी लता, अभिनेत्री रूपा गांगुली आदींनी मुंबईत प्रचारासाठी तळ ठोकला होता. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि भाजप नेते केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्यासह उत्तर पूर्व अर्थात ईशान्य मुंबईत जोरदार प्रचार केला. राज यांनी शनिवारी भांडुप आणि विक्रोळीतील सर्व शाखांना भेट देत महायुतीसाठी प्रचार केला.

---

# केरळला पावसाचा रेड अलर्ट

● **मुंबई । वीरभूमी –**
भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुढील दोन दिवसांत केरळमध्ये अत्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला असून त्यांनी राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये १९ आणि २० मे रोजी रेड अलर्ट जारी केला आहे.

राज्यातील पथनामथिट्टा, कोट्टायम आणि इडुक्की या दोन जिल्ह्यांसाठी हा रेड अलर्ट आहे. त्याव्यतिरिक्त, तिरुअनंतपुरम, कोल्लम, अलाप्पुझा आणि एर्नाकुलम या दोन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. हवामान विभागाने २१ मे साठी नऊ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यापैकी काही भागात रेड अलर्ट प्रमाणेच पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

नागरिकांनाही सावधगिरीचा इशारा जारी केला असून प्रशासनाने मदत पथकांनाही सज्ज राहण्याची सूचना केली आहे. दरम्यान, कोकण किनारपट्टीवर १ जून ते ३१ जुलै या कालावधीत खोल समुद्रात मासेमारी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केले आहेत. बंदी काळात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या कालावधीमध्ये मासळी व सागरी प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात प्रजनन होत असते. तसेच समुद्रात नद्यांव्दारे मोठ्या प्रमाणात खनिजद्रव्य वाहात जातात. त्याचप्रमाणे क्षारतेचे प्रमाण कमी होते आणि समुद्राच्या तळातील मुलद्रव्ये पाण्याच्या वरच्या थरात येतात.

त्यामुळे प्लवंग निर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊन मासळीच्या लहान जीवांना पोषक वातावरण तयार होते. परिणामी मासळीच्या साठ्याचे जतन होते. त्याशिवाय या कालावधीत वादळी हवामान असल्याने जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता असते. त्यापासून मच्छीमारांचे संरक्षण व्हावे या हेतूने वरील कालावधीत यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारीस बंदी घालण्यात आलेली आहे.

# नाशिक शिक्षक मतदार संघ निवडणुकीसाठी विवेक कोल्हे इच्छुक; स्नेहलता कोल्हे यांनी घेतली पिचड यांची भेट

● **अकोले । वीरभूमी –**
नाशिक शिक्षक मतदार संघ निवडणुकीत विवेक कोल्हे इच्छुक असून त्यांच्या मातोश्री स्नेहलता कोल्हे यांनी आज राजूर येथे येऊन माजी मंत्री मधुकर पिचड यांची भेट घेऊन आशिर्वाद मागितले तर तब्येतीची विचारपूस करत या वयातही साहेब तुम्ही संगणकासारखे काम करतात हे पाहून मनस्वी आनंद झाल्याचे कोल्हे म्हणाल्या.

शनिवारी दुपारी दोन वाजता कोपरगाव तालुक्याच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचा अकोले तालुक्यात दौरा होता त्यांनी प्रथम राजूरला येऊन माजी मंत्री मधुकर पिचड यांचे निवासस्थानी येऊन त्यांची भेट घेतली. तब्येतीची विचारपूस करत थोड्या राजकीय गप्पा झाल्या. देशाचे राज्याचे प्रश्न,

कौटुंबिक विचारपूस करत त्यांनी नगर जिल्ह्याला प्रथमच संधी प्राप्त झाली असून नाशिक शिक्षक मतदार संघासाठी विवेक इच्छुक असून आपले आशिर्वाद असावेत. त्यावर श्री. पिचड यांनी शुभेच्छा देत मदतीचे आश्वासन दिले.

यावेळी अकोले एज्युकेशनचे अध्यक्ष दातीर, सचिव सुधाकर अप्पा देशमुख, सत्यनिकेतन संस्थेचे सचिव टी. एन. कानवडे, श्रीस्वामी समर्थ सेवा संस्थेचे सचिव बापू काळे, सुनील वाळुंज, आदिवासी उन्नती सेवा संस्थेचे सचिव मंगलदास भवारी, अध्यक्ष भरत घाणे उपस्थित होते.

माजी आमदार वैभव पिचड हे दिंडोरी मतदार संघात भारती पवार यांच्या प्रचारार्थ गेल्याने त्यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्यात आला. तर अभिनव शिक्षण संस्थेचे मधुकर नवले, बबनराव महाले यांची भेट घेतली.

# शेवगाव तालुक्यातील शेतीसाठी मुळाचे आवर्तन सोडा

## माजी जि. प. सदस्या हर्षदा काकडे । जनशक्ती विकास आघाडीचे पाटबंधारे विभागाला निवेदन

● **नगर । वीरभूमी –**
शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला मुळा धरणातून उन्हाळी आवर्तन त्वरित सोडा अन्यथा जनशक्ती विकास आघाडी मोठे जनआंदोलन हाती घेईल, अशा आशयाचे निवेदन जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदा काकडे यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील शेतकऱ्यांनी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली आर. पाटील यांना दिले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, मुळा पाटबंधारे विभागाअंतर्गत शेवगाव तालुक्यातील जानापूर पाणी वापर संस्था निंबेनांदूर, माका व पाचुंदा या परिसरातील शेतकऱ्यांना पाणी वाटपासाठी स्थापन होऊन साधारतः २० वर्ष झालेली आहे. पाणी वापर संस्थेमार्फत पाटाला पाणी आल्यानंतर रोटेशननुसार शेतकऱ्यांना शेतीसाठी समान पाणी वाटप करणे ही संस्थेची जबाबदारी असते. चालू वर्षी मुळा पाटबंधारा विभागाने दोन रोटेशन देऊ असे शेतकऱ्यांना सुरवातीलाच जाहीर केले होते. म्हणून शेतकऱ्यांनी दोन रोटेशनचे पाणी मिळेल या आशेने भुईमुग, कांदा, ऊस, फळबागा, जनावराची चाऱ्याची पिके आदी पिके घेतली होती. पाणी वाटप संस्थेमध्ये शेतकऱ्यांनी पाणी पट्टीभरून त्याच्या रीतसर पावत्या देखील घेतल्या आहेत. मुळा पाटबंधारा विभागाकडून पाण्याचे रोटेशन ५ एप्रिल ते १२ मे आवर्तन सोडण्यात आले. त्यामध्ये जानापूर पाणी वाटप संस्थेने व पाटबंधारे विभागातील कर्मचारी यांच्या अनागोंदी कारभारामुळे शेतकऱ्यांना ८ मे ते १२ मे याकाळात ५ दिवसच पाणी मिळाले. रीतसर पाणी पावती भरूनही या पाणी वापर संस्थेतील फक्त २०% शेतकऱ्यांची भरणे झाले व ८०% शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही. त्यानंतर रोटेशन बंद झाले. परिणामी येथील शेतकऱ्यांनी या पाण्याच्या आशेवर घेतलेली पिके उन्हाची तीव्रता वाढत असल्याने जळून चालले आहेत तर फळबागा उध्वस्थ होण्याच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे मुळा धरणाचे आवर्तनातून शेवगाव तालुक्यातील व अगोदरच्या रोटेशनचे पाणी न मिळालेल्या निंबेनांदूर येथील जानापूर पाणी वाटप संस्थेअंतर्गत येणाऱ्या शेतीसाठी व पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीला त्वरित पाणी सोडावे. व या पाणी वाटप संस्थेतून निंबेनांदूर सोसायटी स्वतंत्र करावी, अशी मागणीही

यावेळी करण्यात आली आहे. असे न झाल्यास जनशक्ती विकास आघाडी मोठ्या स्वरूपाचे जनआंदोलन हाती घेईल असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर तात्याबा खोसे, ज्ञानदेव यादव, चंद्रकांत पुंडे, अंबादास पुंडे, रामनाथ पुंडे, दत्तात्रय चेके, विलास चेके, भाऊसाहेब चेके, कैलास बटोळे, प्रवीण बटोळे, प्रियंका बटोळे, मंगल बटोळे, राजेंद्र गोयकर, मधुकर कोकाटे, मीराबाई चेके, भानुदास म्हस्के, पांडुरंग पुंडे, दिलीप म्हस्के, अनिता चेके, महादेव खोसे, पांडुरंग पालवे, बन्सी यादव, कडूचंद म्हस्के आदींच्या सह्या आहेत.

# SPOT NEWS

## नगरमध्ये होणार अहिल्यादेवी होळकर स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धा

**नगर । वीरभूमी –**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्ताने सांस्कृतिक संचालनालय आणि विचार भारत यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दोन टप्प्यात होईल. स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक २४ मे रोजी न्यू आर्ट्स कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये स.१० वाजल्यापासून पार पडेल. प्रथम येणाऱ्या पन्नास स्पर्धकांनाच सहभाग नोंदवता येईल. तसेच परीक्षकांच्या मूल्यमापनानुसार जे स्पर्धक अंतिम फेरीसाठी निवडले जातील त्यांची स्पर्धा ३१ मे रोजी सहकार सभागृह स्टेशन रोड अहिल्यानगर येथे दुपारी एक वाजता होईल.त्यामध्ये प्रथम पारितोषिक– १०,००० रुपये, द्वितीय ७०००, तृतीय ५०००, तसेच प्रथम उत्तेजनार्थ ३०००, द्वितीय उत्तेजनार्थ ३००० रुपये असे पारितोषिकाचे स्वरूप असेल. स्पर्धेसाठी विषय असे – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर – एक कुशल प्रशासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर – यांचे धार्मिक कार्य, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर– यांचे कृषी धोरण, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक. सादरीकरणाची वेळ ५ ते ७ मिनिटे असतील. प्रवेश विनामूल्य आहे. अधिक माहितीसाठी बलभीम पठारे – ९४२०४७०००१ व प्रा.अशोक सागडे– ९७३०९९५८६४ यांच्याशी संपर्क साधण्यॉचे आवाहन करण्यात आले आहे.

## संशोधन विषयाच्या तळाशी जात सखोल ज्ञान घ्यावे : भोंजाळ

**नगर । वीरभूमी –**

संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाचा फायदा येणाऱ्या पिढीला होईल या भावनेने करावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन देवून संशोधनाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. संशोधनासाठी फार किचकट विषय न घेता साध्या व सोप्या विषयांची निवड करावी. त्या विषयाचे सखोल ज्ञान घेत तळाशी जाऊन विद्यार्थ्यांनी संशोधन करावे. यासाठी तासंतास त्या विषयाचे वाचन करावे. संशोधन व अनुवादन सकारात्मक विचाराने केले तर ते नक्की यशस्वी होते. विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे आयोजन करून सारडा महाविद्यलयाने विद्यार्थ्यांना उचित प्रोत्साहन व मार्गदर्शन केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व अनुवादक चंद्रकांत भोंजाळ यांनी केले. पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्राच्या वतीने महाविद्यालयात पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक व अनुवादक चंद्रकांत भोंजाळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतिलाल कोठारी, प्राचार्य डॉ.महेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, प्रा. प्रकाश जाधव, प्रा.दया देठे, ज्येष्ठ कवी व संशोधन केंद्राचे विद्यार्थी चंदकांत पालवे आदींसह प्राध्यापक व कार्याभ्यासमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मराठी संशोधन केंद्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सुमारे महिनाभर चालणाऱ्या या कोर्समध्ये राज्यात नावाजलेलतज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. ॲड.अनंत फडणीस म्हणाले, विद्यार्थी हित लक्षत घेवून सारडा महाविद्यालयाने करोना कळतही विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे आयोजन केले होते. डॉ.माहेश्वरी गावित या महाविद्यालयाच्या प्राचार्य झाल्यापासून महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये वाढ झाली आहे. विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी उच्च स्थान प्राप्त करावे. सुमतिलाल कोठारी ,म्हणाले, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन करण्यासाठी सारडा महाविद्यालयात कायमच विविध शैक्षणीक उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणल्या, इतर महाविद्यालयांमध्ये विद्यावाचस्पती कार्याभ्यास कोर्सचे आयोजन आभासी पद्धतीने होत आहे.

# ‘नागवडे’कडून प्रति टन २७०० रुपये प्रमाणे ऊस पेमेंट वर्ग

### कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे । सन २०२४-२५ च्या गाळप हंगामासाठी मिल रोलरचे पूजन

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने सन २०२३-२४ मधील गाळप केलेल्या ५ लाख ८५ हजार ७४० मे. टनाचे २७०० रूपये प्रति मेट्रिक टनाप्रमाणे संपूर्ण पेमेंट ऊस पुरवठादार सभासद शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केले असून उर्वरित रक्कम दीपावली पूर्वी अदा केली जाणार असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले.

कारखान्याच्या सन २०२४-२५ गळीत हंगामाच्या पूर्व तयारीचा एक भाग म्हणून शुक्रवार दि. १७ रोजी मिल रोलर पूजन समारंभात नागवडे बोलत होते. कारखान्याचे संचालक योगेश भोईटे व संदीप औटी यांच्या शुभहस्ते मिल रोलरची विधीवत पूजा करण्यात आली. यानंतर व्हाईस चेअरमन बाबासाहेब भोस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत नागवडे पुढे म्हणाले की, स्व. शिवाजीरावबापू नागवडे यांच्या विचारांचा व संस्काराचा वारसा आणि वसा घेऊन कारखान्याचे संचालक मंडळ सभासद, शेतकरी व कामगार यांच्या हिताला सातत्याने प्राधान्य देऊन काटकसरीने कारभार करत आहे. मार्च महिन्यातील ऊस गाळपाचे प्रति मे. टन रुपये २७०० याप्रमाणे सर्व पेमेंट कारखान्याने बँकेत वर्ग केले असल्यामुळे सभासद व ऊस पुरवठादार शेतकरी यांच्यामध्ये समाधानाचे व विश्वासाचे वातावरण तयार झालेले आहे. सध्या सहकारी साखर कारखान्यांसमोर अनेक अडचणी आहेत. तरीही नागवडे कारखाना ऊस दराबाबत कधीही मागे राहिलेला नाही व उद्याच्या काळातही राहणार नाही. आज मिल रोलर पूजन झाले म्हणजे गळीत हंगामाची तयारी वेगाने करावी लागणार असून सर्व कामे वेळेच्या आत पूर्ण होणे गरजेचे आहे. कारखान्याचे उच्चांकी गाळप करण्याकरिता ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन नागवडे यांनी केले.

अध्यक्षपदावरून बोलताना बाबासाहेब भोस म्हणाले की, गतवर्षी अनेक संकटांवर मात करून राजेंद्रदादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली एकजुटीने ६ लाखापर्यंत गाळप करण्याचा प्रयत्न केला. परंतु उद्दिष्ट पूर्ण करता आले नाही. चालू वर्षी मात्र गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करणे करिता आपल्यातील त्रुटी दूर करून सर्वांनी एक दिलाने काम करावे. नागवडे कारखान्याने आज अखेर सभासद, कामगार, शेतकरी, ऊसतोड मजूर, मुकादम, व्यापारी यांना केंद्रस्थानी मानून योग्य न्याय दिलेला आहे. त्यामुळे सर्वांनी जबाबदारी स्वीकारून काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन भोस यांनी केले.

कार्यक्रमास संचालक सुभाष शिंदे, श्रीनिवास घाडगे, भाऊसाहेब नेटके, शरद जगताप, डी. आर. काकडे, प्रशांत शिपलकर, विश्वनाथ गिरमकर, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, बंडू जगताप, लक्ष्मण रायकर, भाऊसाहेब बरकडे, ह.भ. प. भाऊसाहेब मासाळ, प्र. कार्यकारी संचालक सतीश जांभळे, चीफ इंजिनिअर दत्तात्रय तावरे, प्रोडक्शन मॅनेजर नाना कळमकर, मुख्य शेतकरी सचिन बागल तसेच कारखान्याचे सर्व खाते प्रमुख व कामगार उपस्थित होते. भाऊसाहेब बांदल यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले तर संचालक सावता हिरवे यांनी आभार मानले.

## युवासेनेच्या शेवगाव तालुका अध्यक्षपदी दादासाहेब कसाळ

**शेवगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील बोडखे येथील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब रंगनाथ कसाळ यांची शिंदे गटाच्या युवासेनेच्या शेवगाव तालुकाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे युवासेना सचिव किरण साळी यांनी पुणे येथील शिवसेना भवनात आयोजित विशेष कार्यक्रम प्रसंगी त्यांच्या नियुक्तीचे पत्र दिले आहे. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख साईनाथ आधाट, सचिन शहाणे, संदीप भागवत, धनंजय काकडे, माऊली मोटकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कसाळ यांचे नियुक्तीबद्दल जिल्हा शिवसेना संपर्क प्रमुख सचिन जाधव, शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल शिंदे, ज्येष्ठ नेते बाबुशेट टायरवाले, तालुका प्रमुख आशुतोष डहाळे यांनी कसाळ यांचे अभिनंदन करून सत्कार केला. यावेळी सत्काराला उत्तर देतांना युवासेना तालुकाध्यक्ष कसाळ यांनी आपण शिवसेना शिंदे गटाशी एकनिष्ट राहून पक्ष टाकेल ती जबाबदारी इमानेइतवारे पार पाडू, अशी ग्वाही दिली.

## पाथर्डीत शंकर महाराज यांचा ७७ व्या समाधी सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम

**पाथर्डी । वीरभूमी –**

श्री सद्गुरु शंकर महाराज हे अवलिया संत आहेत. अविलियाची लीला ओळखण्याकरीता माणसाचे मन आणि विचार हे सात्त्विक असावे लागतात. तुमच्या मनात शुद्ध भाव व भक्ती नसेल तर ते मन तुम्हाला मठ, मंदिरात जाऊ देत नाही. म्हणून प्रत्येकाने चांगले मन व विचार ठेवूनच कार्य करावे. भक्ती करताना सत्य, पथ्य, नियम संभाळून ते कायम जवळ ठेवा. कर्तव्य करताना सत्याने करा. त्यातच देव आहे. म्हणून प्रत्येकाची भिती ठेवा. तरच आपल्याकडून चांगले कर्तव्य होईल असे आशिर्वचन शंकर महाराज मठाचे मठाधिपती महंत माधव बाबा यांनी दिले.

पाथर्डी येथील मठात सद्गुरु शंकर महाराज यांच्या ७७ वा समाधी सोहळादिन व माधव बाबा तपपूर्ती दिनानिमित्त तीन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने पालखी, प्रवचन, भजन, भक्तीसंध्या व दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आज पार पडलेल्या समाधी सोहळा दिनाच्या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून आलेले भाविक भक्त उपस्थित होते. आजच्या कार्यक्रमाचे यजमान नाशिक येथील शंकर भक्त व नाशिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता प्रल्हाद सोनवणे व सुनिता सोनवणे यांच्या हस्ते महापूजा व महाआरती संपन्न झाली. यावेळी जयंत भदाणे, धनश्री भदाणे, श्रीरामपूर सोनई येथील डॉ. मेहेत्रे, नेवासा येथील कानिफनाथ राऊत, वणी येथील राजेंद्र चालसे, हभप. कारखेले महाराज, संजय महाराज वारे, दादा मर्दाने, कांबळे साहेब, अभंग साहेब, पिंपळे साहेब, माजी नगरसेवक रामनाथ बंग, संतोष तागड, सचिन नागापुरे, गणेश घुले, संजय कुलकर्णी, भैय्या पानगे, विशाल उदमले, वर्धमान रेदासनी, संतोष जिरेसाळ आदी शेकडो भक्तगण उपस्थित होते. तीन दिवसीय चालणाऱ्या या सोहळ्याचे उद्याचे यजमान व अन्नदाते राजूशेठ चोरडिया आहेत तर तपपूर्ती दिनाचे यजमान व अन्नदाते अशोक साठे आहेत. वरील सर्व कार्यक्रमाला भाविक भक्तांना उपस्थित राहण्याचे आवाहन सद्गुरु शंकर महाराज भक्ती मठाचे मठाधिपती प.पू. माधवबाबा यांनी केले आहे.

### आ. थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन कार्यालयाकडून

# काकडवाडी येथील आदिवासी कुटुंबास मदत

**संगमनेर । वीरभूमी –**

विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एक तालुका एक परिवार ही संकल्पना राबवली जात असून तालुक्याच्या विविध कुटुंबांच्या सुखदुःखात आमदार बाळासाहेब थोरात नेहमी सहभागी होत असतात नुकत्याच झालेल्या वादळी वाऱ्याने व अवकाळी पावसाने काकडवाडी येथील नुकसानग्रस्त झालेल्या आदिवासी कुटुंबाला इंद्रजीतभाऊ थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन कार्यालयाच्या वतीने किराणा किटचे वाटप करण्यात आले.

संगमनेर तालुक्यातील काकडवाडी येथील दत्तू वेनुनाथ माळी या आदिवासी कुटुंबाचे मागील आठवड्यात झालेल्या वादळी वाऱ्याने व पावसाने घरावरील पत्रे उडाले व घरातील सर्व जिवानावश्यक वस्तू कपडे धान्य यांची मोठे नुकसान झाली. त्यांच्या राहत्या घराची भिंतही कोसळली. त्यामुळे आदिवासी कुटुंबावर मोठे संकट ओढावले.

ही माहिती यशोधन कार्यालयाचे जनसेवक केशव फड यांनी यशोधन कार्यालयाला कळवताच इंद्रजीतभाऊ थोरात व कॅन्सर तज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी सेवक प्रा बाबा खरात यांनी कुटुंबाला तातडीने भेट दिली. व यशोधन कार्यालय मार्फत सदर कुटुंबास किराणा साहित्य वाटप करण्यात आले.

दत्तू वेणूनाथ माळी यांना शबरी घरकुल योजनेअंतर्गत घर मिळाले होते. त्यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. घरकुलासाठी दुरुस्तीसाठी मदत मिळावी यासाठी गटविकास अधिकारी संगमनेर यांना आमदार बाळासाहेब थोरात यांचे शिफारस पत्र दिले असून स्थानिक कामगार तलाठी यांचे मार्फत पंचनामा करून शासनामार्फत शक्य ती आर्थिक सहकार्य दिले जाईल अशी माहितीही प्रा बाबा खरात यांनी यावेळी दिली.

आपत्तीग्रस्त, संकटात सापडलेल्यांना, नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्यांना, अपघाती मृत्यू झालेल्यांना यशोधन कार्यालयातून तत्पर सेवा दिली जाते. कार्यालयाचे मार्गदर्शक आमदार बाळासाहेब थोरात, इंद्रजीतभाऊ थोरात, डॉ. जयश्रीताई थोरात, श्रीराम कुऱ्हे, पी. वाय. दिघे, आरोग्य सेवक महेश वाव्हाळ, सर्व जनसेवक यांच्याकडून वेळोवेळी यशोधन कार्यालयामार्फत मदत मिळवून दिली जाते.

## जिल्हा मराठा हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची परदेशात उत्तुंग भरारी

**नगर । वीरभूमी –**

शहरातील जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेकनॉलॉजि, अहमदनगर या नामांकित महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलिया, अमेरिका, न्युझीलँड, दुबई, मॉरिशस, मालदीव, कॅनडा व इतर देशातील विविध पंचतारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मोटेल, ट्रॅव्हल कंपनी मधे नोकरी मिळाली असून, सदर विद्यार्थी नोकरी साठी रुजू झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया, अमेरिकेमध्ये नोकरी मिळणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. अमेरिकन पंचतारांकित हॉटेलमध्ये रितेश दंडवते, ऋषभ घोडके, संकेत आढाव, आयुब शेख, प्रथम बनसोडे, सोमेश्वर स्वामी, निशांत परदेशी, निनाद अस्वर, रोहित धुमाळ, चक्रधर जगताप या विद्यार्थ्यांची मुलाखती द्वारे निवड झाली.अत्यंत अवघड असणारा अमेरिकन वर्क विसा त्यांना प्राप्त झाला व ते अमेरिकन हॉटेल्स मध्ये कार्यरत आहेत. ऑस्ट्रेलियाच्या प्रसिद्ध अशा फाइव स्टार हॉटेल्स आणि रेस्टॉरंट मध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी साईनाथ लांडे, अभिषेक चुंबळकर, प्रकाश सावंत, कु. शुभांगी मुसमाडे, रियाज शेख, इत्यादी विद्यार्थी यावर्षी मुलाखती द्वारे निवडले व त्यांना ऑस्ट्रेलियन विजा प्राप्त झाला व ते ऑस्ट्रेलियन हॉटेल्स मध्ये सध्या कार्यरत आहेत. आखाती देशातील सुप्रसिद्ध दुबई या शहरांमध्ये शेख उवेझ व कु. अनुजा उनवणे यांची निवड मुलाखती द्वारे झाली व दोघेही तेथे यशस्वीरित्या कार्यरत आहेत न्युझीलँड येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये रितेश खटके हा विद्यार्थी मुलाखती द्वारे निवड होऊन सध्या कार्यरत आहे. जिल्हा मराठा हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयातून हॉटेल मॅनेजमेंटचा पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर अनेक विद्यार्थी भारतातील ताजमहल हॉटेल, ओबेराय हॉटेल्स, मेरियत हॉटेल्स, हयात हॉटेल्स तसेच रेस्टॉरंट मध्ये देश विदेशात यशस्वीरित्या सुपरवायझर पासून मॅनेजर लेव्हलपर्यंत कार्यरत आहेत.

SPOT NEWS

## बिरेवाडी येथे रक्तदानाने छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**नगर । वीरभूमी –**

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवानिमीत्त शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संघटना तसेच बिरेवाडी ग्रामस्थांकडून दरवर्षी भव्य बालसंस्कार शिबिर तसेच भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते. बिरेवाडी पंचक्रोशीतील बालक जास्तीत जास्त संख्येने या बालसंस्कार शिबिरात सहभागी होत असतात. वर्षानुवर्षे बालसंस्कार शिबिरात सहभागी होणाऱ्या बालकांची संख्या वाढत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत शालेय विद्यार्थ्यांसाठी बालसंस्कार शिबिर म्हणजे बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व विकास, समाजातील एक जबाबदार व्यक्तिमत्व घडण्यास तसेच सर्वांगीण विकासासाठी एक पर्वणीच ठरत आहे. शिवनेरी रक्तपेढी यांच्या सहकार्याने बिरेवाडी परिसरातील बहुसंख्य युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत सर्वश्रेष्ठ दानरक्तदान शिबिरातही सक्रिय सहभाग नोंदवत रक्तदान केले. बालसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना नाश्ता व भोजन व्यवस्था ज्ञानदेव मोठ्याभाऊ ढेंबरे (माऊली उद्योग समूह) तसेच दिनकर देवराम ढेंबरे (हॉटेल गुरुदत्त) यांच्याकडून देण्यात आली. शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक/प्रदेशाध्यक्ष शिवश्री राहुल ढेंबरे पाटील यांच्या संकल्पनेतून सदरचे भव्य बालसंस्कार शिबीर यशस्वी होण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवश्री शिवनाथभाऊ नाईकवाडी(अ.नगर जिल्हा संघटक, शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य) यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावली. तसेच भव्य रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी सर्वच रक्तविर आणि शिवनेरी रक्तपेढीची संपूर्ण टीम यांचे विशेष योगदान मिळाले. यावेळी भाऊसाहेब ढेंबरे, अक्षय ढेंबरे, योगेश ढेंबरे, बाबाजी डोमाळे, संजय सागर, प्रकाश सागर, बाळासाहेब गळंगे, उत्तम भोसले, निलेश सागर, नवनाथ ढेंबरे, जालिंदर गुळवे, तुषार ढेंबरे, राजेंद्र ढेंबरे, अभय ढेंबरे, तसेच बिरेवाडी पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संघटनेचे पदाधिकारी यांचे मोलाचे योगदान मिळाले.

## कलम १३८ मधून आरोपीची निर्दोष मुक्तता

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा येथील बालाजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत यांनी पांडुरंग एकनाथ चव्हाण रा. लिंपणगाव यांच्या विरूध्द कर्जाचे हप्ते भरले नाही व थकीत कर्जाचे फेडीपोटी रूपये ९ लाख ३० हजार रुपयांच्या रकमेचा दिलेला धनादेश अनादरीत झालेबाबत कथने करून फिर्यादी पतसंस्थेने आरोपीविरूध्द सन २०१७ साली श्रीगोंदा मे. फौजदारी कोर्टात निगोशिएबल इन्स्ट्युमेंट क्ट या कलमाअंतर्गत १३८ प्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल केला होता. या खटल्यात फिर्यादी पतसंस्थेने पुरावे दाखल करूनही आरोपी हा फिर्यादी पतसंस्थेस अनादरीत धनादेशावरील नमुद रक्कम रूपये ९,३०,००० रूपये कायदेशीर देणे लागत आहे ही बाब फिर्यादी पतसंस्था सिध्द करू शकली नाही. मा. एन. एस. काकडे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीगोंदा यांनी आरोपीची दिनांक ०२ मे रोजी निर्दोष मुक्तता केलेली आहे. या खटल्याचे कामकाज मे. कोर्टासमोर ७ वर्षे ३ महिने व १३ दिवस चालले आहे. या खटल्यात आरोपीच्या वतीने ॲड. स्वानंद पी. राऊत व त्यांचे सहकारी ॲड. दामु वडवकर व ॲड. अमित वाळुंज यांनी कामकाज पाहीले.

# दारुबंदी असलेल्या राजूरमध्ये पकडली अवैध दारु

## सामाजिक कार्यकर्त्यांची तत्परता । दारु साठा पोलिसांच्या ताब्यात दिला

**अकोले । वीरभूमी –**

दारुबंदी असलेल्या राजूर गावात खुलेआम सुरु असलेली अवैध दारु वाहतुक करणाऱ्या वाहनासह सुमारे १ लाख ३३ हजार ७६० रुपायांचा मुद्देमाल सामाजिक कार्यकर्त्यांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला आहे.

अकोले तालुक्यातील आदिवासी भागाचे केंद्र बिंदु असलेल्या राजूर गावात सन २१ आँक्टोबर २००५ रोजी दारुबंदी चा ठराव राजूरकरांनी केल्याने चार विदेशी आणि एक देशी दारुच्या दुकानाचा परवाने रद्द झाले. सुमारे १३ वर्षे राजुरच्या दारुबंदीला झाले आहेत. परंतु राजूर गावामध्ये अवैध दारूचे दुकान गल्लीबोळत सुरू झालेत. दारूबंदी करणारे कार्यकर्ते व महिलांनी गावातील अवैध दारू बंद करण्यासाठी आंदोलने केलेली आहेत. अवैध दारु विकणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी अनेकदा निवेदने दिली.जिल्हा पोलिस अधिक्षकापासुन तर पोलीस उप अधिकाऱ्यापर्यंत कारवाई करण्याचे आदेश प्राप्त होऊनही अवैध दारूविक्री चालू आहे.

राजुर गावांमध्ये तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक व दारुबंदी कार्यकर्ते, नेते, पुढारी आणि महिलांनी राजुर गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची अनेकदा मागणी पोलीस अधिकाऱ्यांकडे केली मात्र राजूरची अवैध दारू बंद होत नसल्यामुळे गावातील सामाजिक कार्यकर्ते सचिन देशमुख, अक्षय देशमुख, बिटु पाबळकर, बाळु कराड, इन्नुस शेख, ग्रा. पं.सदस्य अतुल पवार, अजय डगळे, गणेश भारमल या तरुणांनी रस्त्यावर उतरत अवैध दारू विकणाऱ्याचा शोध घेत बुधवारी रात्री १२ वाजल्याच्या सुमारास पिंपरकणे रस्त्यावर राजूर गावात मारुती कारचा पाठलाग करत अवैध देशी दारुचा साठा असलेले वाहन पकडून अवैध दारू पकडल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन देशमुख यांनी राजुर पोलीस स्टेशनला फोनवरुन सांगितले असता तब्बल अर्धा तासाने पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि आरोपींना घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर आरोपींना खुर्ची बसायला दिल्याची तक्रार जिल्हा पोलीस प्रमुख अधिक्षकाकडे केली असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

राजुर पोलिसांनी आरोपी विक्रम अशोक घाटकर (वय ३३), अर्जुन विठ्ठल शिरसाट (वय २६, रा. राजुर) तर खुलताबाद (जि. औरंगाबाद) येथील अल्पवयीन मुलासह अवैद्य दारू जवळ बाळगणाऱ्या तीन आरोपी कडुन बॉबी संत्रा देशी दारूच्या ६१८ सीलबंद बाटल्या असा ४३ हजार २६० रुपये किंमतीचा मुद्देमाल आणि बॉबी संत्रा कंपनीच्या देशी दारूच्या सिलबंद बाटल्या १० हजार ५०० रुपये किंमतीचा तसेच मारुती ८०० कंपनीची क्र. एमएच १४, ए.व्ही. ३७६० असा सर्व एकुण १ लाख ३३ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

पुढील तपास स.पो.नि. दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. दोंदे हे करीत आहेत.

## घरफोडीच्या गुन्ह्यातील सराईताला कोतवाली पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**नगर । वीरभूमी –**

घरफोडीच्या गुन्ह्यातील एका सराईतास कोतवाली पोलिसांनी जेरबंद केले आहे. विष्णु सोनबा धोत्रे (रा. वडारवाडी, केडगाव, नगर) असे आरोपीचे नाव असून, या सराईताच्या अटकेने कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. दि. ७ मे रोजी फिर्यादी मधुकर तबाजी भावले (रा. शाहूनगर, केडगाव) यांचे बंद घर फडून पंधरा हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेण्यात आला होता. भावले हे मुलाकडे पुणे येथे गेले असताना त्यांच्या बंद घराचा कडीकोयंडा तोडून कपाटातील १५ हजार रुपये रोख रक्कम चोरण्यात आली होती. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

दरम्यान, कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी गुन्ह्याच्या तपास कामी गुन्हे शोध पथकास आदेश दिले. गुन्हे शोध पथकास माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा वडारवाडी, केडगाव येथे रहाणारा विष्णु धोत्रे याने केलेला असुन त्याच्यावर घरफोडी, चोरीचे गुन्हे दाखल आहेत. त्यावरुन गुन्हे शोध पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली होती. चौकशीत त्याने पाच घरफोड्यांची कबुली देऊन लपवुन ठेवलेला एकूण ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल काढून दिला. ही कारवाई कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सपोनि योगिता कोकाटे, उपनिरीक्षक प्रविण पाटील, पोहेकॉ. राहुल शिंदे, पोहेकॉ. शाहीद शेख, पोहेकॉ. योगेश भिंगारदिवे, पोहेकॉ ए. पी. इनामदार, संदीप पितळे, पोना अविनाश वाकचौरे, मपोना संगीता बडे, पोकॉ. अभय कदम, पोकॉ. दीपक रोहोकले, पोकॉ. सत्यजित शिंदे, पोकॉ तानाजी पवार, पोकॉ सुरज कदम, पोकॉ प्रमोद लहारे, पोकॉ. अमोल गाडे, पोकॉ. सुजय हिवाळे, पोकॉ. सचिन लोळगे यांच्या पथकाने केली.

## पाथर्डी बसस्थानकावर चोऱ्यांच्या घटना वाढल्या

**पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील नवीन बसस्थानकावर होणाऱ्या महीलांच्या दागीन्यांची चोरी व खिसे कापणाऱ्यांचा त्रास इतका वाढलाय की, आता सहनही होत नाही व सांगता येत नाही. शनिवारी दुपारी ज्योती बाळासाहेब गोल्हार (रा. येळी) यांच्या पिशवीतील दीड तोळ्याचे दागीने व एक हजार रुपये असा सव्वा लाख रुपयाची दागीने एका महीलेने बसमधे चढताना लांबविले. गेल्या महीनाभरात सुमारे सात घटना येथे घडल्या आहेत व लाखो रुपयाचा ऐवज चोरीला गेला आहे. महीलांना लुटणाऱ्या महीला आरोपीला पकडणे हा पोलिसासमोर मोठे आवाहन आहे.

शहरातील जुने बसस्थानक, नवीन बसस्थानक, भाजीबाजार, नवीपेठ, डॉ. आंबेडकर चौक या भागात गर्दी असते. आठवडा बाजारात महीलांचे दागीने व पैसे लुबाडणारे चोरटे यांचा उपद्रव खुपच वाढला आहे. एसटी बसमधे चढताना महीलांचे दागीने चोरणे व पाकीटमारी वाढली आहे. शहरातील काही खिसेकापु आहेत. मात्र आता बाहेर गावाहुन आलेले चोरटे हातचलाखी दाखवित आहेत.

नवीन बसस्थानक परीसरात रोजच चोऱ्या वाढल्या आहेत. शनिवारी दुपारी ज्योती बाळासाहेब गोल्हार (रा. येळी) या पाथर्डी बसस्थानकावर पाथर्डी-बीड एसटीमध्ये चढत असताना त्यांच्या पिशवीतील दीड तोळ्याचे सोन्याचे दागीने व एक हजार रुपये असा ऐवज एका महीलेने लांबविला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. पिशवी हातात असलेली व लहान मुलगा सोबत असलेली महीला दागीने घेवुन पळाली आहे. ती सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसते आहे. पोलिसात ज्योती गोल्हार यांनी तक्रार दिली आहे. नवीन बसस्थानक परीसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. पोलिसांनी चोरट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी होत आहे. खिसेकापु व महीला दागीने चोर यांना पकडण्याचे आवाहन आता पोलिसासमोर आहे.

## दातृत्व संपन्न व्यक्तिमत्व ॲड. मनोहरराव देशमुख यांनी उभारलेल्या

# वृद्धाश्रमाचा निराधार वयोवृद्धांना मायेचा आधार

**अकोले । वीरभूमी –**

ज्यांचे भविष्य घडविण्यासाठी रक्ताचे पाणी केले. त्या मुलांनी म्हातारपणात दगा दिल्यानंतर रक्ताचे नातेच निष्ठुर झाले. त्यामुळे आता पुढचे आयुष्य कसे जंगायचं, या अवस्थेत केळुगणच्या देशमुख वृद्धाश्रमात आपुलकीची वागणूक, योग्य औषधोपचार व जेवणा, नास्त यामुळे जीवन जगण्याची उमेद पुन्हा निर्माण झाली. ही कहाणी आहे, राजूर (केळुगण) येथील कै. नानासाहेब देशमुख या वृद्धाश्रमात राहणाऱ्या निराधार वयोवृद्ध नागरिकांची.

ज्यांनी पंधरा-सोळा वर्षे हाता-खांद्यावर वाढविले, काबाडकष्ट करुन शिक्षण पुर्ण केले आणि तळहातावरच्या फोडाप्रमाणे मुलाचा सांभाळ करणाऱ्या त्या आई-वडिलांना आपल्या मुलाबाळाच्या सुखात रमणाऱ्या दिवसातील म्हणारपणात वृद्धाश्रमाची पायरी चढत आयुष्याचा काठीचा आधार घ्यावा लागतो, हे भयानक दुःख, दारिद्र्यापेक्षा मोठे असल्याचं चित्र अकोले तालुक्यातील दातृत्व संपन्न व्यक्तिमत्व ॲड. मनोहरराव देशमुख यांनी उभारलेल्या कै. नानासाहेब विठोबा देशमुख वृद्धाश्रमातील वयोवृद्धांच्या बोलक्या भावना चेहऱ्यावरुन दिसून आल्या, तर आपल्या मुला मुलींनी वयोवृद्ध काळामध्ये आईवडीलांची म्हातारपणात आधाराची काठी होण्याची स्वप्न बहुसंख्ये वयोवृद्धाचे स्वप्न ते स्वप्नच राहिले आहेत. तर आत्मसन्माने जीवन जगता यावे यासाठी राजूर (केळुगण) येथे आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत ॲड. एम. एन. देशमुख यांनी सुमारे तीन एकर शेतात भव्य इमारत, गोशाळा, मंदिर, बगीचा, भाजीपाला, आंबा, पेरु, चिकु, फणस अशा फळबागा बरोबरचं भाजीपाल्याची शेती ही उभी केली. तर या वृद्धाश्रमामध्ये जवळपास १०० नागरिक राहू शकतील एवढी प्रशस्त इमारत बांधण्यात आली आहे.

या इमारतीमध्ये किचन, डायनिंग हॉल, ध्यान धारणा हॉल, महिला व पुरुष वयोवृद्धांसाठी राहणे व झोपण्यासाठी स्वतंत्र सुसज्ज हॉल आणि स्वतंत्र शौचालय निर्माण करत या वृद्धाश्रमाचे दातृत्व स्वीकारले आहेत. सन २०११ साली या वृद्धाश्रमाची निर्मिती झाली आहे. तब्बल १३ वर्षांमध्ये ३०० च्या दरम्यान वयोवृद्ध वृद्धाश्रमात दाखल झाल्याची नोंद झाली आहे. परंतु काहींचे वय तर काही मयत झाले.तर आता या वृद्धाश्रमामध्ये वयोवृद्ध महिला, पुरुष ४३ आहेत. तसेच म्हातारपणात सर्व अवयव क्षीण झाले असतात. या अवस्थेतुन प्रत्येकालाचं जावे लागणार आहे. मात्र म्हतारपणात काही मुले आईवडीलांना संभाळत नाही. ही चिंताजनक बाब आहे. शासनाने कायदा करावा. आईवडीलांचा सांभाळ न करणाऱ्यावर कारवाईची तरतूद करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

### अंत्यविधीलाही येत नाही वंशाचे दिवे

निराधार व आप्तेष्टांनी नाकारलेल्या वृद्ध नागरिकांसाठी वृद्धाश्रम ही एक जगण्याची सोय आहे. तर वृद्धाश्रमात कोणी मयत झालं तर त्यांच्या मुला- मुली व नातेवाईकांना कळविले जाते. परंतु बहुतांश मुलं मुली किंवा नातेवाईक येत नसल्यामुळे वृद्ध आश्रमाच्या जवळच अंत्यविधी करण्यात येतो. तसेच मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या अंत्यविधी पासून तर दहावा व तेराव्या या सर्व प्रक्रिया कर्मचारी सोयीस्करीत्या पार पाडतात. तर काही मृतदेह लोणी येथील प्रवरा रुग्णालयाच्या स्वाधीन केले जातात. आतापर्यंत बऱ्याचं जणांचा अंत्यविधी वृद्धाश्रम समितीने केला आहे.

– **सचिन वाकचौरे,** व्यवस्थापक

### निःस्वार्थीपणे वृद्धाश्रमात वृद्धांची सेवा

शासनाने २००२ नंतर वृद्धांश्रमांना देण्यात येणारे अनुदान बंद केले आहे. त्यामुळे वृद्धाश्रम चालविण्याची अनेक ठिकाणी सेवाभावी संस्थांना कसरत करावी लागत आहे. कित्येक योजनांवर शासन कोट्यवधी रूपये खर्च करते. मात्र वृद्धांसाठी काही रूपयांचे अनुदान देऊ शकत नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो. पण घरच्यांनी डावलल्यानंतर सरकारनेही वाऱ्यावर सोडल्याचे दिसत आहे, परंतु अकोले तालुक्यातील राजुर परिसरातील केळुगण येथील कै. ह. भ. प. नानासाहेब देशमुख वृद्धाश्रम शासन किंवा कोणाकडुन अनुदान, निधी न घेता मोफत वृद्धाश्रमातील वृद्धांची निःस्वार्थीपणे सेवा करत आहेत.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# शहीद जवान ज्ञानेश्वर सानप अनंतात विलिन

## लष्करी इतमामात शिरसाटवाडी येथे साश्रुनयनाने दिला अखेरचा निरोप | हजारोंचा जनसमुदाय भावूक

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील अनेक तरुण भारतीय लष्करात देशातील विविध ठिकाणी विविध पदांवर कार्य करत भारत मातेची सेवा करत आहेत. काल तालुक्यातील शिरसाटवाडी येथील भारतीय सैन्य दलातील पलटन नायक या पदावर कार्यरत असणारे ज्ञानेश्वर कचरू सानप हे आपले कर्तव्य बजावत असताना शहीद झाले. आज शहीद जवान सानप यांच्या मुळ गावी त्यांच्या पार्थिवावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शुक्रवारी सायंकाळी शिरसाटवाडी ग्रामस्थ, कुटुंबीय, मित्रपरिवार व तालुक्यातील हजारो नागरिकांच्या उपस्थितीत शहीद सानप यांना साश्रुनयनांनी अखेरचा निरोप देण्यात आला.

शुक्रवारी दुपारी पाथर्डी शहरातून सैन्यदलाच्या वाहनामधून त्यांच्या पार्थिवाची मिरवणूक काढण्यात आली. अमर रहे.. अमर रहे.. ज्ञानेश्वर सानप अमर रहे.. भारत माता की जय. जय महाराष्ट्र, जय शिवराय अशा घोषणा देत, देश सेवा व कर्तव्य बजावत शहीद झालेल्या आपल्या लाडक्या जवानाला अखेरचा निरोप देताना सगळ्यांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले होते.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. तालुक्याच्या वतीने तहसिलदार उध्दव नाईक, पोलीस दलाकडून सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवाजी तांबे, पोलिस उपनिरीक्षक सचिन लिमकर, उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर यांनी पुष्पचक्र अर्पण केले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ॲड. प्रताप ढाकणे, ओबीसी नेते दिलीप खेडकर, अविनाश पालवे, सेवानिवृत्ती सैनिक संघटना यांच्यासह अनेकांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहीली. शहीद जवान ज्ञानेश्वर सानप यांना अग्नी डाग दिल्यानंतर लष्करी जवानांनी बंदुकीतून हवेत फैरी झाडून अखेरचा निरोप दिला.

शहीद ज्ञानेश्वर सानप यांच्याबरोबर असणाऱ्या सैन्य दलातील त्यांच्या सहकाऱ्यांना ही यावेळी अश्रू अनावर झाले. शहीद जवान सानप हे जम्मू काश्मीर मधील कुपवाडा जिल्ह्यातील सीमावर्ती भागात बर्फाळ प्रदेशात आपले कर्तव्यावर असताना डोक्याला मार लागल्याने जखमी झाले होते. त्यानंतर त्यांच्यावर उपचार ही झाले परंतु आजार अधिक बळावल्याने गुरुवारी सानप यांचे निधन झाले. सानप हे १५ मराठा एल आय गटात ते कार्यरत होते. गेली दहा ते बारा वर्षे त्यांनी सैन्य दलात सेवा दिली. ज्ञानेश्वर सानप हे अतिरेकी कारवाईत सहभागी होऊन त्यांनी अनेक अतिरेक्यांना कंठस्नान घातले.

ज्ञानेश्वर सानप हे सध्या सिक्कीम या ठिकाणी सेवेत होते. त्यांच्यावर पुणे येथे सैन्य दलाच्या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. शहीद ज्ञानेश्वर सानप यांच्या मागे त्यांच्या कुटुंबातील आई, वडील, पत्नी, बहीण यांच्यासह मित्रपरिवार व नातेवाईक यांच्यावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# कलियुगात पुण्यकर्मच महत्वाचे : परमानंदगिरी महाराज

**● कोपरगाव । वीरभूमी –**

पुण्यकर्मामुळे सुखाची प्राप्ती होते तर मुर्त्यू नंतर मोक्ष प्राप्त होतो. पापकर्मामुळे दुःख होते तर मुर्त्यु नंतर नरकाची प्राप्ती होते. त्यासाठी पुण्यकर्म करणे फार महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन महामंडलेश्वर परमानंदगिरी महाराज यांनी केले.

तालुक्यातील कान्हेगाव येथे जपाणुष्टाण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून प्रवचन प्रसंगी ते भाविकांना उपदेश करतांना ते बोलत होते.

जो जन्माला आला तो मरणार आहे. आपले मरण कोणालाही माहिती नाही ते फक्त काळाला माहिती आहे. आपण झोपतो पण काळ झोपत नाही. काळ आपली घडी घडीला वाट पाहत आहे की अजून किती वेळ राहिला. वेळ संपली की, काळ जीवाला घेऊन जातो. जसा बोका अचानक उंदिराला घेऊन जातो तसा काळ आपल्या जिवाला घेऊन जातो.

या जगात सुखाची प्राप्ती करून घ्यायची असेल तर परम्यातम्याला आपलसं करून घ्यावं लागतं. त्यासाठी काया, वाचा व मनाने पवित्र व्हावे लागते असे महाराजांनी यावेळी सांगितले.

सदर सत्संग प्रसंगी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी कान्हेगाव, वारी, भोजडे, रामवाडी, संवत्सर, धोत्रे, तळेगाव, अंदरसुल, सडे आदीसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किसन काजळे, संदीप वाळुंज, बाळासाहेब काजळे, राजेंद्र सांगळे, वसंतराव भाकरे, ॲड. वाल्मीक काजळे, सुनील काजळे यांचेसह सर्व तरुण मंडळ, भजनी मंडळ परिश्रम घेत आहेत.

# अमृतवाहिनी ई.ॲण्ड टी. सी च्या ७० विद्यार्थ्यांना नोकऱ्या

**● संगमनेर । वीरभूमी –**

उच्च शिक्षणानंतर नोकरीसाठी होणारी धावपळ वाट्याला न येता अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील ई.ॲण्ड टी. सी. विभागातील ७४ पैकी ७० विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नोकऱ्या मिळणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रीया प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश व विभाग प्रमुख डॉ. आर. पी. लबडे यांनी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आय.टी. आणि इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी कंपन्यांना लागणारे कौशल्यपूर्ण अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षमतेमुळे अमृतवाहिनी अभियांत्रिकीच्या इंजिनियर्सला जगभरातील नामांकित कंपन्यांकडून मागणी होत आहे. या क्षेत्रातील गतिमान विकासाच्या उदयोन्मुख तंत्रज्ञानातील गरजा ओळखून अमृतवाहिनी व्यवस्थापनाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सामंजस्य करार केलेले आहेत. महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी जपान व जर्मन भाषेवर प्रभुत्व मिळवले आहे. यासाठी महाविद्यालयाने ‘सकुरा’ हे जपानी भाषेच्या वाढीसाठी केंद्र विकसीत केले आहे. या वर्षीच्या प्लेसमेंटस् मध्ये मुलभुत इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांचा सर्वाधिक समावेश असल्याने विद्यार्थी व पालक वर्गामध्ये भावी शाश्वत करिअरबद्दल समाधान व्यक्त होत आहे. आय. टी. क्षेत्रातील कंपन्यांच्या अल्प कर्मचार्यांकडून काम करण्याच्या धोरणामुळे सद्यस्थितीतील प्लेसमेंट मध्ये तेजी कमी जाणवत असल्याने टेक्नॉलॉजी कंपन्यांमध्ये मागणी वाढत आहे. इलेक्ट्रीक वाहने, सेमिकंडक्टर चीप डीझाईन, वाहन उद्योगातील अद्ययावत तंत्रज्ञान, इंडस्ट्री ४.० तंत्रज्ञान या सर्व बाबींमुळे ई. अँण्ड टी. सी. च्या विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळत आहेत.

ई.अँण्ड टी. सी. विभागातील कंपन्यांना प्रत्यक्ष भेटी, इंन्टर्नशीप, मुल्यवर्धक कार्यक्रम, स्कील डेव्हलपमेंट कोर्सेस, प्रकल्प स्पर्धा, माजी विद्यार्थी संवाद, कंपन्यांतील तज्ञांचे मार्गदर्शन या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांची तांत्रिक व वैयक्तीक तयारी होण्यास मदत झाली आहे, परिणामी प्लेसमेंटची संख्या वाढत आहे.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. महसुलमंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयुताई देशमुख, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर अॅकेडेमिक्स डॉ. जे. बी. गुरव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए.व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा.व्ही. पी.वाघे, विभाग प्रमुख डॉ.आर. पी.लबडे, प्लेसमेंट अधिकारी प्रा. पी.बी.वाकचौरे, प्लेसमेंट विभाग समन्वयक प्रा. व्ही. आर.आवारे यांनी अभिनंदन केले आहे.

# अकोलेतील काजवा महोत्सवाची तयारी पूर्ण

## शेंडी विश्रामगृहावर नियोजन बैठक | पर्यटकांसाठी नियमावली जाहीर

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोटातील काजवा महोत्सवाची तयारी पुर्ण झाली असुन वन्यजीव विभागाकडुन काजव्यांचा पर्यटकांना मनमुराद आनंद घेता यावा, यासाठी काही बंधने घातली असुन रात्री ९ नंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये अभयारण्यात प्रवेश दिला जाणार नसल्याचे वन्यजीव विभागाकडुन सांगण्यात आले आले.

अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोटात दरवर्षी २५ मे ते १५ जुनच्या दरम्यान काजव्यांची चमचम बघावयास मिळत असते. काजव्यांचा हा करिष्मा बघण्यासाठी दरवर्षी पर्यटक मोठ्या प्रमाणात अभयारण्यात येत असतात. याही वर्षी पर्यटकांची गर्दी लक्षात घेता त्या गर्दीवर नियत्रंण मिळविण्यासाठी वन्यजीव विभागाकडुन काही बंधने घालण्यात आली आहेत. काजवा महोत्सवासंदर्भात शेंडी येथे वन्यजीव विभागाच्या विश्रामगृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी राजुर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक सरोदे, वन्यजीव विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल आडे, वनपाल शंकर लांडे, भास्कर मुठे, परिसरातील टेंट धारक व वन्यजीव विभागाचे कर्मचारी हजर होते.

या आढावा बैठकीत काजवा वाचविण्याचे आवाहन करण्यात आले असुन जर काजवा वाचला तरच काजवा महोत्सव वाचेल असे वन्यजीव विभागाकडुन सांगण्यात आले. काजवा पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना रात्री ९ वाजेच्या आतच परवानगी देण्यात आली असुन ९ वाजेनंतर कुणालाही प्रवेश मिळणार नाही. काजवा हा अभयारण्यात असुन प्रवेश शुल्क आकारुनच अभयारण्यात प्रवेश मिळेल. अभयारण्यात ठिकठिकाणी वाहनतळ बनविण्यात आले असुन या वाहनतळावरच वाहने पार्कींग करणे बंधनकारक राहील. अभयारण्यात कोणत्याही प्रकारचा मद्यसाठा नेऊ दिला जाणार नाही. अभयारण्यातील टोलनाक्यावर पोलिस विभागाकडुन वाहनांची तपासनी करण्यात येईल. अभयारण्यात काजवा बघण्यासाठी गेलेल्या पर्यटकांनी काजव्यांचा आनंद घेताना दुरुनच आनंद घ्यावा. काजव्यांच्या झाडांना हलवू नये. काजवास्थळ सोडुन पर्यटकांनी जंगलात एकटे फिरु नये, काजवा बघुन झाल्यानंतर रात्री दहा वाजेच्या आत अभयारण्यातुन बाहेर पडावे. अभयारण्यात टेंट साईडवर बुकींग केलेल्या पर्यटकांची नोंदवहीत नोंद करणे बंधनकारक राहील, रात्री दहानंतर अभयारण्यात कोणतेही वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात येणार नाही. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर कायद्याचा बडगा उगारला जाणार असल्याचे सुतोवाच वन्यजीव विभागाकडुन देण्यात आले आहेत. राजुर पोलिसांच्या वतीने सर्व पर्यटकांनी काजव्यांचा शांततेत आनंद लुटण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी नेत्रालयात पहिली बुबुळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

**● नगर । वीरभूमी –**

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी नेत्रालयात पहिली कॉर्निया (बुबुळ) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. नेत्रालयाचे वैद्यकीय संचालक डॉ.अशोक महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.नलिनी महेंद्रुकर यांनी ही शस्त्रक्रिया केली. या शस्त्रक्रियेमुळे रूग्णाला दृष्टी परत मिळाली असून तो सामान्य जीवन जगू शकतो. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत मोफत करण्यात आली, अशी माहिती प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.

संगमनेर येथील सौरभ विजय कानकेटे या तरूणाला दोन तीन वर्षांपासून डोळ्यांना त्रास होत होता. नातेवाईकांच्या सल्ल्याने तो नगरला आनंदऋषीजी नेत्रालयात आला. तपासणी केली असताना बुबुळ प्रत्यारोपण करणे आवश्यक वाटल्याने डॉक्टरांनी रूग्णाला त्याची कल्पना दिली. सर्व प्रक्रिया लवकर पूर्ण करून ही नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आली. नेत्रालयातील अत्याधुनिक जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान व डॉक्टरांचे कौशल्य यामुळे नेत्रालयातील ही पहिलीच बुबुळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. रूग्णाला दृष्टी परत मिळाली आहे. आनंदऋषीजी नेत्रालयातील तत्पर आणि सर्वोच्च दर्जाची उपचार सेवा यामुळे आपल्याला नवी दृष्टी मिळाल्याची भावना रूग्णाने व्यक्त केली. आनंदऋषीजी नेत्रालय अत्याधुनिक नेत्रोपचारांसाठी ओळखले जाते. व्हिजन सेंटर, नेत्र शिबिरांच्या माध्यमातून नेत्रालयाने नगरसह बीड, धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रूग्णांना उत्कृष्ट सेवा दिली आहे. आतापर्यंत नेत्रालयात ७६ हजार पेक्षा अधिक यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. १९ नेत्रतज्ज्ञांची टिम रूग्णसेवेसाठी कार्यरत आहे.

नेत्रालयातील ओपीडीमध्ये दररोज सुमारे ५०० रूग्णांची तपासणी करण्यात येते. तर २५ व्हिजन सेंटरमध्ये दररोज सुमारे ६०० रूग्णांची तपासणी करण्यात येते. वर्षभर शिबिरांचे आयोजन करून अधिकाधिक रूग्णांना उच्च दर्जाच्या उपचार सुविधांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न असतो. कॉर्निया प्रत्यारोपण यशस्वी शस्त्रक्रियेमुळे नेत्रालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.